जा.क्र./लेखा/८०१/२०२५
दिवाणी न्यायालय, क.स्तर, गंगापूर
दि. १५/०२/२०२५

# निविदा सुचना

## दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, गंगापूर, ता.गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

मा. जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र./लेखा/सी–1/2001/2025, दिनांक 14/02/2025 अन्वये आदेशित केल्यानुसार दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, गंगापूर या कार्यालयातील खालील नमुद जुने/मोडकळीस आलेले फर्निचर दुरुस्त करणेकरीता स्थानिक बाजारपेठेतून मोहरबंद दरपत्रके दिनांक 15/02/2025 ते 18/02/2025 या कालावधीत मागविण्यात येत आहेत.

निविदाकारांनी दरपत्रके सादर करण्यापुर्वी गंगापूर येथील जुन्या न्यायालयीन इमारती मधील जुने/मोडकळीस आलेल्या जून्या फर्निचरची प्रत्यक्ष पाहणी करुन नंतरच फर्निचर दुरुस्ती करणे बाबतचे दरपत्रके सादर करावे.

| फर्निचरची नावे | लाकडी | लोखंडी | एकूण |
|---|---|---|---|
| टेबल | 2 | 4 | 6 |
| खुर्ची | 25 | 1 | 26 |
| कपाट | 4 | 4 | 8 |

मोहरबंद दरपत्रके दिनांक 18/02/2025 रोजी सायंकाळी 06.00 वाजेपर्यंत किंवा त्यापुर्वी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, गंगापूर जिल्हा औरंगाबाद या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे. तद्नंतर प्राप्त झालेल्या मोहरबंद दरपत्रकांचा या प्रकियेत समावेश करण्यात येणार नाही. विहीत मुदतीत प्राप्त मोहरबंद दरपत्रके पडताळणी अंती खरेदी समिती त्याबाबत उचित कार्यवाही करील.

हे कार्यालय कोणतेही कारण न सांगता प्राप्त झालेल्या मोहरबंद दरपत्रके स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार राखून ठेवत आहे.

आदेशावरुन,

Court of the Civil Judge, (J.D.) and J.M., F.C. GANGAPUR

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
गंगापूर

दिनांकः– 15/02/2025.

टिप :–

1. निविदाकारांनी दरपत्रक सादर करतांना त्यावर जीएसटी/एसजीएसटी क्रमांक नमुद असलेले तथापी, जीएसटी/एसजीएसटी क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक नमुद असलेले निविदाकाराच्या लेटर हेडवरील दरपत्रक वैध असतील.
2. निविदाकारांनी दरपत्रकासोबत पॅनकार्डची छायांकीत प्रत जोडणे बंधनकारक असेल.
3. प्रत्येक निविदाकारास फक्त एक दरपत्रक सादर करण्याची परवानगी असेल.
4. प्राधिका–या बरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छुक संस्थेने एकल निविदा देण्याबाबत निविदाकारांना 'हमीपत्र' सादर करावे लागेल.

प्रत :– 1) सुचना फलक, दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, गंगापूर, जि.औरंगाबाद.
2) सुचना फलक, तहसिल कार्यालय, गंगापूर, जि.औरंगाबाद.
3) जिल्हा न्यायालय, औरंगाबाद यांचे संकेतस्थळ.